| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ८ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक. | प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक | शिक्षक म्हणून पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शाळेतील प्रशिक्षित शिक्षकांना/अध्यापकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |
| ९ | जिल्हा सेवा (दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील शिक्षक/अध्यापक. | (एक) प्राथमिक शाळा शिक्षक<br>(दोन) प्राथमिक शाळा अध्यापक | १. जे उमेदवार—<br>(एक) आधींपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>परंतु, केंद्र किंवा राज्य समाजकल्याण मंडळाच्या विद्यमाने चालविण्यात येत असलेल्या "संक्षिप्त पाठ्यक्रमाद्वारे" शिक्षकाच्या पेशासाठी स्वत: अर्हता प्राप्त करून घेतलेल्या प्रौढ स्त्रियांच्या बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला वरची वयोमर्यादा ३८ वर्षेपर्यंत शिथिल करता येईल.<br>आणखी असे की, प्राथमिक शाळा शिक्षक म्हणून पूर्वानुभव असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला वरची वयोमर्यादा ३० वर्षेपर्यंत शिथिल करता येईल, आणि<br>जे उमेदवार—<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रिक्युलेशन परीक्षा किंवा लोकशाळा परीक्षा किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली कोणतीही इतर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि प्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र परीक्षा |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ७ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) गृहविज्ञान–अध्यापक/ अध्यापिका. | (एक) गृहविज्ञान अध्यापक (दोन) गृहविज्ञान अध्यापिका | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली गृहविज्ञानाची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु, मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि गृहविज्ञानाची पदविका प्रमाणपत्र धारण करणाऱ्यांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| [1][७-अ. | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) लघुलेखन, टंकलेखन निर्देशक. | लघुलेखन आणि टंकलेखन निर्देशक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ज्याचे वय [2][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि<br>(तीन) [3][आयुक्त, शासकीय परीक्षा केंद्र, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे] यांनी दिलेले लघुलेखनातील दर मिनिटाला १०० शब्दांहून कमी नसेल इतक्या वेगाचे आणि टंकलेखनातील दर मिनिटाला ४० शब्दाहून कमी नसेल इतक्या वेगाचे प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २८ मे १९७१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ फेब्रुवारी १९८३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## परिशिष्ट चार

(भाग एक)

(नियम ५ पहा)

जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) यात समाविष्ट असलेल्या पदांच्या नेमणुकीकरीता उमेदवारांच्या अर्हता व नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम.

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) प्रथम श्रेणी. | (एक) वरिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण).<br>(दोन) सहाय्यक शिक्षण अधिकारी (वरिष्ठ). | १. जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक), श्रेणी दोन मधील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे व जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) यातील माध्यमिक शाळांतील प्रशिक्षित स्नातक सहाय्यक शिक्षक असून ज्यांना बी. एड. पदवी घेतल्यानंतरच्या ६ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल अशा व्यक्तींची पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>२. माध्यमिक शाळांतील सहाय्यक शिक्षकांच्या पदोन्नतीचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा अधिक नसेल. |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) द्वितीय श्रेणी. | (एक) विस्तार अधिकारी (शिक्षण)<br>(दोन) सहाय्यक शिक्षण अधिकारी<br>(तीन) वरिष्ठ सहाय्यक शिक्षण उप निरीक्षक. | १. (अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) श्रेणी तीनमधील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील ५ वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तींची एकतर पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>[2][* * * *] किंवा<br>[1][(ब) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) मधील सहाय्यक शिक्षक आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शिक्षक व अध्यापक ज्यांना—<br>(एक) बी. एड. पदवी (किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतील अगर कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापनाचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असेल, किंवा |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ एप्रिल १९७५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ डिसेंबर १९८३ अन्वये हा मजकूर वगळण्यात यावा.

परिशिष्ट चार—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | (दोन) बी. एड. पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असेल किंवा<br>(तीन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरच्या पाच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल. अशा शिक्षक व अध्यापकांमधून योग्य उमेदवारांची तात्पुरती बदली करण्यात येईल.]<br>(क) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे स्नातक असतील, आणि<br>[1][(तीन) (अ) बी. एड. पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) घेतल्यानंतरच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतील अगर कनिष्ठ महाविद्यालयातील कमीत कमी तीन वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल किंवा<br>(ब) बी. एड. पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असेल किंवा<br>(क) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरच्या पाच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.] :<br>परंतु, चांगली अर्हता आणि/किंवा अनुभव असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ एप्रिल १९७५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २—चालू | | | [1][परंतु आणखी असे की, जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) मधील सहाय्यक शिक्षक किंवा जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शाळा शिक्षक हे जर दिनांक १ जानेवारी १९७६ रोजी एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी विस्तार अधिकारी (शिक्षण) व्दितीय श्रेणी किंवा वरिष्ठ सहाय्यक शिक्षक उप निरीक्षक हे पद धारण करीत असतील तर नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी अशा सहाय्यक शिक्षकांच्या किंवा प्राथमिक शिक्षकांच्या बदलीने /तात्पुरत्या बदलीने अगोदरच केलेल्या नेमणुकांवर या नियमातील कशाचाही परिणाम होणार नाही.]<br>२. ७५ टक्क्यापेक्षा कमी नसतील एवढी पदे नामनिर्देशनाव्दारे व बदलीव्दारे भरण्यात येतील.<br>३. या पदावर नेमण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांनी समाज शिक्षणाचा प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक करता येईल. त्यांच्यापैकी प्रशिक्षण घेण्याकरिता ज्यांची निवड झाली असेल त्यांनी सोबत जोडलेल्या नमुना "अ" मधील करारनामा करून दिला पाहिजे. |
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) तृतीय श्रेणी. | (एक) कनिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण).<br>(दोन) सहायक शिक्षण उप निरीक्षक<br>(तीन) सहाय्यक शिक्षण अधिकारी (कनिष्ठ) | (१) जे उमेदवार—<br>(अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र व एस. टी. सी. किंवा तुल्य आहे ते धारण करीत असतील व ज्यांना माध्यमिक किंवा पूर्ण माध्यमिक शाळातील कमीत कमी ७ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल असे सहायक अध्यापक, सहायक अध्यापिका, चित्रकला शिक्षक, हिंदी शिक्षक व गृहविज्ञान अध्यापक/अध्यापिका :<br>परंतु जे बी. ए. किंवा बी. एस. सी. व एस. टी. सी. किंवा टी. डी. आहेत अशांच्या बाबतीत अध्यापनाचा अनुभव ३ वर्षापर्यंत अनुभव ३ वर्षापर्यंत कमी करता येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ जून १९७९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३—चालू | | | (ब) असे जे प्रकृतिने सुदृढ असतील असे जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) व जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यातील अधिकृत नगरपालिका यातील [1][ * * * * ] आणि<br>(एक) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशांच्या बाबतीत अध्यापन अर्हता मिळविल्यानंतर १० वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल किंवा जे प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशांच्या बाबतीत अध्यापन अर्हता मिळविल्यानंतर १५ वर्षाची अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल. किंवा<br>(दोन) सेवेत असतांना जे पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले असतील व बी.एड किंवा तुल्य पदवी ज्यांनी धारण केली असेल व प्रशिक्षित (प्राथमिक) शिक्षक म्हणून ७ वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल असे प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक.<br>(क) ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र व एस. टी. सी. प्रमाणपत्र धारण केले असेल आणि त्या श्रेणीतील सात वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल असे जिल्हा सेवा (वर्ग तीन) दुय्यम शैक्षणिक श्रेणी एक मधील सहाय्यक विस्तार अधिकारी (शिक्षण) व शिक्षण सहाय्यक<br>(२) ७५ टक्क्यापेक्षा कमी होणार नाहीत एवढी पदे वरील प्रकार (१) (ब) मध्ये येणाऱ्या प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांच्या पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील.<br>(३) या पदावर नेमण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांनी समाज शिक्षणाचा प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक करता येईल हे प्रशिक्षण घेण्याकरिता ज्यांची निवड झाली असेल त्यांनी सोबत जोडलेल्या नमुना "अ" मधील करारनामा करून दिला पाहिजे. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ११ जानेवारी, १९७१ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.